गण गण गणात बोते
ब्रम्हांडनायक सदगुरु
श्री.गजानन महाराज
यांच्या पुण्यतिथीनिमित्त
कोटी कोटी प्रणाम..!

दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

आजचा सुविचार

भारतीयांची सर्वात मोठी समस्या
हीच आहे की, ते मोठे विचार
करायचे विसरून गेले आहेत...

– धीरूभाई अंबानी

वर्ष : ०५ | अंक : १३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२८ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

तीन सोंड, सहा हात आणि मोरावर विराजमान पुण्यातलं त्रिशुंड गणपती मंदिर



अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, पुणे : राज्यभरासह देशभरात गणेशोत्सवाचा आनंदाचा सण भक्तीभावाने साजरा होत आहे. आज २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थीचा उत्साह असून बाप्पाच्या आगमनाने सर्वत्र चैत्यन्याचं वातावरण आहे. राज्यभरात विविध ठिकाणी गणपती बाप्पाची अनेक मंदिर आहेत. या मंदिरांमध्ये गणेशाची विविध रुपं पाहायला मिळतात. असंच एक अनोखं मंदिर पुण्यात आहे. या बाप्पाचं खास वैशिष्ट असून त्याचा अतिशय जुना इतिहासही आहे.

तीन सोंड आणि सहा हातांचा गणपती बाप्पा...

पुण्यातील त्रिशुंड गणपती मंदिर हे बाप्पाच्या राज्यभरातील काही खास मंदिरांपैकी एक आहे. त्रिशुंड गणपती मंदिरात तीन सोंड आणि सहा हात असलेला बाप्पा आहे. गणपती बाप्पा त्यांचं वाहन उंदरावर विराजमान असतो, पण हा बाप्पा मोरावर विराजमान झालेला दिसतो. गणपतीच्या हातात त्रिशुळ देखील आहे.

तब्बल १६ वर्ष सुरू होतं मंदिराचं बांधकाम...

महत्त्वाची बाब म्हणजे या त्रिशुंड गणपती मंदिराचं बांधकाम तब्बल १६ वर्ष सुरू होतं. १७५४ मध्या या मंदिराच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर १७७० मध्ये हे मंदिर उभारून तयार झालं. हे मंदिर एका भीमगीरजी गोसावी नावाच्या तपस्वी व्यक्तीने उभारलं होतं. सुरुवातीला हे मंदिर भगवान शिवशंकराचं होतं. नंतर ते गणपती बाप्पाला समर्पित करण्यात आलं. भीमगीरजी गोसावी यांची समाधीही या मंदिरात आजही आहे.

पुण्यातील सोमवार पेठेतील गणपती बाप्पा...

सोमवार पेठेत असलेलं हे त्रिशुंड गणपती मंदिराचं बांधकाम संपूर्ण काळ्या दगडाचं बनलेलं आहे. या मंदिराच्या भिंतींवर, स्तंभांवर मराठा, राजस्थान तसंच दक्षिण भारतातील अनेक गोष्टी पाहायला मिळतात. युद्धाची चित्र, मोठं-मोठे हत्ती, गेंड्याचं चित्र, ब्रिटीश सैनिक, पौराणिक गोष्टी आढळतात. तसंच देवनागिरी, संस्कृतमध्ये काही लिहिलेला मजकूर आहे. तसंच भगवत गीतेतील काही श्लोकही या मंदिराच्या वास्तूवर लिहिलेले आहेत. या मंदिराला ऐतिहासिक महत्त्व आहे. पुण्यात या मंदिराकडे खास लक्ष दिलं गेलं आहे. भक्तांचं श्रद्धास्थान असण्यासह हे मंदिर पर्यटन तसंच कलाप्रेमीसाठी अतिशय सुंदर, खास मंदिर ठरतं.

पुण्याचा मानाचा कसबा गणपती आणि दगडूशेठ गणपती थाटात विराजमान

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, पुणे : राज्यासह संपूर्ण देशात लाडक्या बाप्पाचे आगमन झालेले आहे. पुण्याच्या गणेशोत्सवाला आगळे वेगळे महत्व आहे. येथील मानाचा पहिला कसबा गणपती आणि दगडूशेठ हलवाई गणपतीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आज दि.२७ रोजी थाटात संपन्न झाला. या दोन्ही गणपतींची आरास पाहण्यासाठी राज्यासह भारतभरातून पुण्यात प्रचंड गर्दी होत असते. या गणपतींची वाजत गाजत पालखीतून मिरवणूक निघाली आणि त्यांना मंडपात स्थानापन्न करण्यात आले. त्यांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा हर्षो उल्हासात गणेश भक्तांच्या उपस्थितीत पार पडला. पुण्याच्या दगडूशेठ हलवाई गणपतीचे यंदाचे १३३ वे वर्षे आहे. यंदा येथे केरळच्या पद्मनाभन मंदीराचा देखावा साकारण्यात आला आहे. हा देखावा पाहण्यासाठी व आपल्या लाडक्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी पुढील दहा दिवस राज्यासह भारतभरातून पुण्यात प्रचंड गर्दी आपल्याला पाहायला मिळणार आहे.

राज्यात गणेशोत्सवाचा जल्लोष...

पारंपारिक वाद्यांच्या गजरात बाप्पाचं आगमन

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, मुंबई : गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया म्हणत मानाच्या गणपतीची मिरवणूक विविध शहरात लक्ष वेधून घेत आहे. गणेशोत्सवाचा आज पहिला दिवस आहे. उत्सवमूर्ती आता थाटात त्यांच्या स्थापना ठिकाणी पोहचत आहेत. त्याठिकाणी विधीवत प्राण प्रतिष्ठापन्ना करण्यात येईल. राज्यात आज घरोघरी आणि विविध मंडळात जल्लोषात गणपती बाप्पाचं आगमन झालं आहे. ढोल-ताशांच्या नादात आणि पारंपारिक वाद्यांच्या गजरात थाटात बाप्पाचे आगमन ठिकठिकाणी सुरू आहे. मानाच्या गणपतीच्या आगमन सोहळ्याची विवध शहरांमध्ये धूम सुरू आहे. भाविक भक्ती भावात न्हाऊन निघाले आहेत. आज पासून राज्यभरात पुढील १० दिवस गणेशोत्सव हा सण मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. मुंबई मधील सगळ्या मोठ्या गणपती मंडळामध्ये उत्साहाच वातावरण पाहायला मिळत आहे. लालबाग-परळ परिसर तर गर्दीने फुलून गेला आहे आणि लालबाग च्या राजाच दर्शन घेण्यासाठी पहिल्याच दिवशी मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. लालबागच्या राजाच्या मुख दर्शन घेण्यासाठी भली मोठी रांग लागली आहे. राज्यातही अनेक शहरात, गाव खेड्यात गणेशोत्सवाचा आनंद सोहळा सुरू आहे. दीड दिवसांचा, पाच दिवसांचा, दहा दिवसांच्या घरगुती गणपत्तीचे आगमन झाले आहे.

गणेशोत्सवादरम्यान पुणेकरांसाठी महत्त्वाचा निर्णय...

दर ३ मिनिटांनी धावणार मेट्रो..

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, पुणे : शहराच्या मध्य भागात गणपती पाहण्यासाठी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) गणेशोत्सवातील गर्दीच्या वेळी स्वारगेट ते जिल्हा न्यायालय दरम्यान दर तीन मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध करून देण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्या दृष्टीने चाचणी घेतली जात आहे. यामुळे मंडई, कसबा पेठ येथील गर्दी कमी करण्यास मदत होणार आहे.

पुण्यातील गणेशोत्सव राज्यासह परदेशातही प्रसिद्ध आहे. या ठिकाणचे गणपती व देखावे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक येतात. यंदा गणेशोत्सवात पहिल्यांदाच जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर मेट्रो सुरू असणार आहे. या मार्गावरील कसबा, मंडई, स्वारगेट ही मेट्रो स्थानके सुरू झाली आहेत. ही स्थानके नागरिकांना थेट मानाच्या गणपती मंडळांजवळ नेतात. त्यामुळे प्रवाशांना गर्दी टाळून मेट्रोने गणेशोत्सव पाहण्यासाठी जाता येणार आहे.

नागरिक रात्री १२ पर्यंत देखावे, गणपती पाहण्यासाठी येतात. त्यामुळे महामेट्रोने पहाटे दोनपर्यंत मेट्रो सेवा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. एका मेट्रोची क्षमता किमान ९०० प्रवाशांची आहे. दर तीन मिनिटांना मंडई येथून प्रवासी स्वारगेट अथवा जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकाकडे जातील. त्यामुळे मध्य भागातील मेट्रो स्टेशनवर गर्दी होणार नाही, असे मेट्रो प्रशासनाकडून सांगण्यात आले. देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी कसबा पेठ मेट्रो स्थानक येथे उतरावे. तेथून गणपती पाहण्यास जावे. परतीचा प्रवास मंडई मेट्रो स्थानकापासून करावा. त्यामुळे एकाच मेट्रो स्थानकावर गर्दी होणार नाही; तसेच वनाझ ते राम वाडी मार्गिकेवरून प्रवास करणाऱ्यांनी पुणे महापालिका मेट्रो स्थानक येथे उतरून देखावे पाहण्यासाठी जावे, असे आवाहन महामेट्रोकडून करण्यात आले आहे. कसबा पेठ, मंडई मेट्रो स्थानक येथील गर्दी कमी करण्यासाठी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मार्गावर मेट्रो दर तीन मिनिटांनी चालविण्याचे नियोजन केले जात आहे. त्यासाठी दोन दिवसांपासून चाचण्या घेतल्या जात आहेत, अशी माहिती महामेट्रो, व्यवस्थापकीय संचालक, श्रावण हर्डीकर यांनी दिली.

मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी! गणेशोत्सवानिमित्त मेट्रो मध्यरात्रीपर्यंत राहणार सुरु

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, मुंबई : गणेशोत्सव कालावधीत मुंबईनगरी अगदी रात्रंदिवस गजबजून जातो. भाविक रात्रभर शहरात फिरत असतात. हीच बाब लक्षात घेत, गुंदवली-दहिसर-अंधेरी पश्चिम ही मेट्रो-२अ व मेट्रो-७ गणेशोत्सवादरम्यान रात्री १२पर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या फेऱ्यांमुळे २८ हजार अतिरिक्त प्रवासी उत्तर-पश्चिम व उत्तर मुंबईतील गणपतींचे दर्शन घेण्यासाठी मध्यरात्रीपर्यंत मेट्रोने प्रवास करू शकणार आहेत.

गुंदवली ते दहिसर पूर्व ही मेट्रो-७ व दहिसर ते अंधेरी पश्चिम ही मेट्रो-२अ, या दोन्ही उन्नत मार्गिका संयुक्त रूपात धावतात. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) महामुंबई मेट्रो ऑपरेशन कंपनी लिमिटेडकडून (एमश्रीडब्ल्यू) या मार्गिका चालवल्या जातात. या संयुक्त मार्गिकेने अलीकडेच एका दिवसातील सर्वाधिक ३.३४ लाख प्रवासीसंख्येचा आकडा पार केला. यानंतर आता ही मेट्रोमार्गिका गणेशोत्सवासाठी सज्ज झाली आहे. यानुसार २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या ११ दिवसांत अखेरची मेट्रो रात्री ११ऐवजी १२पर्यंत असेल. त्यामुळे १२ फेऱ्या

वाढणार आहेत. या मेट्रोच्या एका गाडीची क्षमता दोन हजार २८० प्रवासी आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. या ११ दिवसांत लाखो भक्त विघ्नहर्त्याच्या दर्शनासाठी मुंबईत प्रवास करतात. त्यांना मध्यरात्रीपर्यंत सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवाससुविधा मिळणे ही आमची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रकारच्या वातावरणात प्रवास करण्यासाठी मेट्रो ही भक्तांसाठी अधिक विश्वासार्ह परिवहन सेवा आहे. त्यादृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा आहे', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. तर, 'गणेशोत्सवात प्रवासाची चिंता न करता उत्सवाचा आनंद घेता येईल', असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

गणेशोत्सवातील फेऱ्या अशा...

सोमवार ते शुक्रवार – एकूण ३१७ फेऱ्या (या आधीच्या ३०५ फेऱ्यांमध्ये १२ फेऱ्यांची वाढ)

गर्दीच्या वेळेत : दर ५ मिनिटे ५० सेकंदांनी एक गाडी

गर्दी नसलेल्या वेळेत : दर ९ मिनिटे ३० सेकंदांनी एक गाडी

शनिवारी

एकूण २५६ फेऱ्या (या आधीच्या २४४ फेऱ्यांमध्ये १२ फेऱ्यांची वाढ)

गर्दीच्या वेळेत दर ८ मिनिटे ६ सेकंदांनी एक गाडी

गर्दी नसलेल्या वेळेत : दर १० मिनिटे २५ सेकंदांनी एक गाडी

रविवारी

एकूण २२९ फेऱ्या (या आधीच्या २१७ फेऱ्यांमध्ये १२ फेऱ्यांची वाढ)

दर १० मिनिटांनी एक गाडी प्रवाशांच्या मागणीनुसार आवश्यक असल्यास अतिरिक्त फेऱ्या चालवण्यात येतील.

दिवेआगर येथील सुपारी संशोधन केंद्राची कामे लवकरात लवकर सुरू करा - कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, मुंबई : रायगड जिल्ह्यातील दिवेआगर येथील प्रस्तावित १४ कोटी रु.ची तरतुद असलेल्या सुपारी संशोधन केंद्राचे काम लवकरात लवकर सुरू करण्याची कार्यवाही कृषी विभागाने करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील दिवेआगर येथे सुपारी संशोधन केंद्र सुरू करण्याबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या वर्षा लड्डा-उंटवाल, दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरू संजय भावे, सहसंशोधक कल्पेश शिंदे, कृषी विभागाच्या उपसचिव प्रतिभा पाटील यासह इतर अधिकारी या उपस्थित होते.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की,रायगड जिलह्यातील दिवेआगर (ता.श्रीवर्धन) येथे होणाऱ्या प्रस्तावित सुपारी संशोधन केंद्रामुळे स्थानिक शेतकऱ्यांना उत्कृष्ट दर्जाची सुपारीची रोपे मिळून या भागाला त्याचा चांगला फायदा होईल. या सुपारी संशोधन केंद्राच्या माध्यमातून सुपारीच्या बुटक्या तसेच दर्जेदार व अधिकचे उत्पन्न देणाऱ्या जाती विकसित करणे, दिवेआगर व परिसरातील हवामानाचा विचार करून आंतरपिके घेण्याचे तंत्रज्ञान विकसित करणे, अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन, रोजगार निर्मिती, रोपवाटिका उभारणे, कलमे विकसित करणे, परिसरातील गावांचा ग्रामविकास आराखडा तयार करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येतील असे नियोजन करावे. सुपारी संशोधन केंद्रासाठी निधी मंजुर असून प्रस्तावित बांधकाम आणि इतर अनुषंगिक बाबीं पूर्ण होण्यासाठी दापोली कृषी विद्यापीठाने निविदा प्रक्रिया गतीने पूर्ण करून कामे सुरू करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

दिवेआगर संशोधन केंद्र पर्यटनाला चालना देणारे ठरेल

- महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की,दिवेआगार हे पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्वाचे ठिकाण असून येथे निर्माण होणारी रोठासुपारी अत्यंत उत्कृष्ट दर्जाचा वाण आहे. हे वाण जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी हे नवीन सुपारी संशोधन केंद्र महत्वाची भुमिका बजावेल. तसेच पर्यटक देखील सुपारी संशोधन केंद्राला भेट देतील अशा दृष्टीने प्रस्तावित सुपारी संशोधन केंद्र तयार करावे असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

आरती संग्रहातून नवी मुंबई महानगरपालिकेचा स्वच्छता व पर्यावरणशीलतेचा संदेश

अक्षराज : जे. के. पोळ

दि.२६, नवी मुंबई : आज २७ ऑगस्ट पासून गणेशोत्सवास प्रारंभ होत असून गणेशोत्सव काळात घरोघरी व सार्वजनिक उत्सवांच्या मंडपात सकाळ, संध्याकाळ श्रीगणेशासह इतर देव-देवतांच्या सामुहिक आरत्या म्हटल्या जातात. या आरत्या म्हणणे नागरिकांना सोयीचे व्हावे यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने दुमड घडी स्वरुपातील आरतीसंग्रह उपलब्ध करुन देण्यात येत असून या अभिनव आरती संग्रहाचे अनावरण महापालिका मुख्यालयात आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अतिरिक्त आयुकत सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व स्मिता काळे आणि इतर विभाग प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

या आरतीसंग्रहात एका बाजूला गणपती, शंकर, देवी, विठ्ठल, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या आरत्या व घालीन लोटांगण ही प्रार्थना मुद्रीत करण्यात आली आहे. तसेच दुसऱ्या बाजूला स्वच्छता, कचरा वर्गीकरण, प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना, सजावटीत पुनर्वापरयोग्य पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा उपयोग, निर्माल्यापासून खतनिर्मितीवर भर असे विविध संदेश आकर्षक चित्रांसह प्रकाशीत करण्यात आले आहेत.

संपादकीय

पुजारा...

भारतीय कसोटी क्रिकेट संघाचा आधारस्तंभ असणारा भारताचा अनुभवी कसोटीवर चेतेश्वर पुजारा याने कसोटीसह सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून नुकतीच निवृत्ती घेतली. त्याच्या निवृत्तीने कसोटी क्रिकेटमध्ये एक तपाहून अधिक काळ अभ्येद असणारी भारताची भिंत ढासळली. त्याची निवृत्ती क्रिकेटप्रेमींना चटका लावून जाणारी ठरली कारण चेतेश्वर पुजारा हा कसोटी क्रिकेटचा खराखुरा आणि कदाचित शेवटचा राजदूत असेल. १५ वर्षापूर्वी म्हणजे २०१० साली जेंव्हा त्याने कसोटी संघात प्रवेश केला तेंव्हाच त्याने दाखवून दिले की कसोटी क्रिकेटमध्ये यशस्वी होण्यासाठी लागणारे तंत्र त्याच्याकडे आहे. राहुल द्रविड हा कसोटी क्रिकेटमधील सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज. चेतेश्वर पुजारा हा देखील तसाच तंत्रशुद्ध फलंदाज. राहुल द्रविडप्रमाणेच त्याचाही बचाव भक्कम. बाद न होण्याची खबरदारी घेत खेळत राहण्याची त्याची शैली राहुल द्रविडसारखीच होती म्हणूनच त्याला द्रविडचा वारसदार म्हंटले जाऊ लागले त्यानेही त्याला दिलेली ही उपाधी सार्थ ठरवली. राहुल द्रविड प्रमाणेच तो ही तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस येऊ लागला. सुरुवातीचे फलंदाज लवकर बाद झाल्यावर एक बाजू लावून धरत संघाचा धावफलक वाढवत नेण्याची जबाबदारी तो पार पाडत असे. बाद न होता गोलंदाजांना थकवण्याची त्याची कला कसोटीतील खूप थोड्या फलंदाजांकडे होती. पुजारा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करायला आला की एक बाजू भक्कम व्हायची. तो नांगर टाकून फलंदाजी करत असल्याने इतर फलंदाज खोऱ्याने धावा काढत असे. त्यामुळे त्याकाळात भारताची मधली फळी ही जगातील सर्वोत्तम मधली फळी मानली जात होती. तो संघात असताना भारताने अनेक अविश्वसनीय विजय मिळवले. या विजयात त्याचा मोलाचा वाटा होता. पुजाराने काढलेल्या १९ शतकांपैकी १३ शतकांच्या वेळी भारताचा विजय झाला. त्याने केलेल्या ६० टक्के धावा भारत जिंकलेल्या कसोट्यांमधील आहेत. विराट कोहली ५८, राहुल द्रविड ३९, तेंडुलकर ३८ यांच्यापेक्षाही ही टक्केवारी अधिक आहे. पुजाराने खेळलेल्या १०३ कसोटीत ४४ च्या सरासरीने ७१९५ धावा धावा काढल्या. या धावा काढताना त्याने १९ शतके आणि ३५ अर्धशतके झळकावली. त्याची ही आकडेवारी पाहून टी २० चे समर्थक त्याला महान फलंदाजांच्या पंगतीत बसवणार नाही हे मान्य. त्याची ही आकडेवारी त्याची ओळख करून देण्यास पुरेशी नाही हे ही मान्य पण या धावा काढताना त्याने दाखवलेला संयम आणि त्याने दाखवलेली हिंमत ही त्याला निश्चितच महान फलंदाजांच्या पंगतीत बसवेल. आक्रमणास प्रतिआक्रमणाने उत्तर देण्याऐवजी त्यांचा आत्मविश्वास खच्ची करण्यावर त्याचा भर असे. तो बाद होत नाही हे पाहून वैतागलेले वेगवान गोलंदाज त्याला इजा पोहचेल अशी गोलंदाजी टाकत. वेगवान गोलंदाजांचा मार खाल्यावरही तो डगमगत नसे. प्रत्येक चेंडू, प्रत्येक षटक आणि प्रत्येक सत्राचा विचार करून तो खेळत असे. २०१८ साली भारताने पहिल्यांदा ऑस्ट्रेलियात कसोटी मालिका जिंकली त्यात त्याचे योगदान मोलाचे होते. त्यात त्याने ५०० हून अधिक धावा केल्या. विशेष म्हणजे या धावा काढताना त्याने १२०० पेक्षा अधिक चेंडूचा सामना केला. या मालिकेत त्याला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले होते. २०१७ मध्ये त्याने ऑस्ट्रेलिया विरुद्धच एका कसोटीत ५२५ चेंडूचा सामना केला ही भारतीय कसोटी इतिहासातील ऐतिहासिक घटना ठरली. देशासाठी सर्वकाही पणाला लावणारा पुजारा सारखा खेळाडू भारतीय क्रिकेटला लाभला हे भारतीय क्रिकेटचे भाग्यच. पुजारा म्हणजे विश्वास आणि समर्पणाचे दुसरे नाव. तो जरी निवृत्त झाला असला तरी कसोटी क्रिकेटमध्ये त्याने दिलेले योगदान क्रिकेटप्रेमी कधीही विसरू शकणार नाही. निवृत्तीनंतर तो समालोचक किंवा प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसेल.

भारतीय कसोटी क्रिकेटचा आधारस्तंभ राहिलेल्या चेतेश्वर पुजाराला पुढील कारकिर्दीसाठी मनापासून शुभेच्छा!

पुण्यातील मानाचे पाच गणपती आणि नवसाला पावणारे गणपती...

स्वामी दळवी
नऱ्हेगाव, पुणे
मोबा. ९८२२२६९०९८

पुण्याचे पाच मानाचे गणपती

लोकमान्य टिळकांनी पुणे शहरात सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. तेव्हापासून मोठ्या उत्साहात शहरात गणेशोत्सव साजरा केला जातो. संपूर्ण जगभरातून पुणे शहरातील गणेशोत्सव पाहिला जातो. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहरातील या गणेश उत्सवाला विशेष महत्त्व आहे. पुणे शहरात मानाचे पाच आणि त्या व्यतिरिक्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, बाबू गेनू गणपती, मंडई गणपती हे गणपती देखील नवसाला पावणारे गणपती म्हणून ओळखले जातात. पुण्यासह राज्यातल्या इतर शहरातही अनेक नागरिक गणेशोत्सव काळात या गणपतीच्या दर्शनासाठी येत असतात.

लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी अवघी पुण्यनगरी सज्ज झाली आहे. मानाच्या गणपतीसह शहरातील प्रमुख सार्वजनिक मंडळाकडून तयारी पूर्ण झाली आहे. आकर्षक देखावे आणि सजावटीसाठी पुण्यातल्या गणेश मंडळांची ख्याती सातसमुद्रापार पोहचली आहे. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने हा उत्साह पुणेकरांसहित सर्व गणेश भक्तांमध्ये पाहायला मिळत आहे. पुणे शहरातील प्रमुख आकर्षण म्हणजे मानाचे गणपती यासोबतच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचा देखावा. यंदा मानाच्या गणपतीसह इतर सर्व मंडळांनी लाडक्या बाप्पासाठी आकर्षक सजावट केली आहे.

मानाचा पहिला कसबा गणपती – पुण्यातील सर्वात जुना आणि सर्वात आदरणीय गणपती ज्याची मुळे शिवाजी आणि जिजाबाईंपासून सुरू होतात. कसबा गणपती हा पुण्याचा अभिमान आहे आणि दरवर्षी विसर्जन मिरवणुकीचे नेतृत्व करण्याचा मान मिळवणारा पहिला मानाचा गणपती आहे. परंतु या गणेश मंडळाचा वारसा खूप खोलवर पसरलेला आहे, तो १६३० पासून, जेव्हा आदिलशहाच्या सैन्याने केलेल्या विध्वंसानंतर जिजाबाई आणि तरुण शिवाजी पुण्यात आले होते. आख्यायिकेनुसार, त्यांच्या निवासस्थानाजवळ गणपतीची मूर्ती सापडली. जिजाबाईंनी ते एक दैवी चिन्ह मानले आणि त्यांनी कसबा गणपती मंदिर नावाचे मंदिर उभारले, ज्याने शहराची आध्यात्मिक मुळे रचली. मंदिराचे काळजीवाहक विनायक भट ठाकर यांनी अशांत काळात गुप्ततेने पूजा चालू ठेवली.

मानाचा दुसरा गणपती

तांबडी जोगेश्वरी मंडळ – तांबडी जोगेश्वरी हे पुणे शहराची (ग्रामदेवी) कुलदैवत मानली जाणारी देवी दुर्गेचे मंदिर आहे. येथील वैशिष्ट्य म्हणजे, दरवर्षी गणेशोत्सवाच्या शेवटी भगवान गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते आणि त्यानंतरच्या वर्षी पुन्हा स्थापना केली जाते. जरी मंदिर १५ व्या शतकात बांधले गेले असले तरी, दुर्गेची मूर्ती अजूनही शाबूत आहे. २००० पर्यंत मंदिरातच गणेशमूर्तीची स्थापना केली जात होती. २००० पासून, मंदिरासमोर एक वेगळा पेंडल लावला जातो आणि मूर्तीची स्थापना चांदीच्या घुमटात केली जाते.

मानाचा तिसरा गणपती

गुरुजी तालीम मंडळ – गुरुजी तालीम हा पुण्यातील तिसरा आदरणीय गणपती आहे. १८८७ मध्ये भिकू शिंदे आणि उस्ताद नलबन या दोन हिंदू आणि मुस्लिम कुटुंबांनी त्याची स्थापना केली होती. म्हणूनच गुरुजी तालीम पुण्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यापूर्वी हे मंडळ स्थापन झाले होते; त्यामुळे त्यांचा प्लॅटिनम जयंती साजरा करणारे ते पहिले मंडळ बनले.

मानाचा चौथा गणपती

तुळशीबाग गणपती मंडळ – तुळशीबाग गणपती हा पुण्यातील चौथा आदरणीय गणपती आहे. त्याची स्थापना १९०१ मध्ये पहिल्यांदा झाली. १९७५ पासून पहिल्या ग्लास फायबर मूर्तीची स्थापना करण्याचा मान या मंडळाला आहे. ही मूर्ती शहराच्या मध्यभागी आणि सर्वात गर्दीच्या भागात आहे. ही मूर्ती १३ फूट उंच आहे आणि ८० किलोपेक्षा जास्त वजनाचे दागिने घालते. कलाकार डी.एस. खटावकर गेल्या अनेक वर्षांपासून या मूर्तीची सजावट करत आहेत.

मानाचा पाचवा गणपती

केसरीवाडा – केसरीवाडा गणपती हा पुण्यातील पाचवा आदरणीय गणपती आहे. १८९४ मध्ये स्थापन झाल्यापासून, केसरी ट्रस्टचा गणेशोत्सव कुमठेकर रोडवरील विंचूरकर वाडा येथे आयोजित केला जात असे, जे त्यावेळी टिळकांचे वडिलोपार्जित घर होते. त्यानंतर १९०५ मध्ये, तो गायकवाड वाडा येथे हलवण्यात आला, जो सध्या केसरीवाडा म्हणून ओळखला जातो.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई

गणपती मंडळ ट्रस्ट – एक भव्य, सोन्याने सजवलेली मूर्ती जी दरवर्षी लाखो भाविकांना आकर्षित करते. पुण्यातील सर्वात प्रसिद्ध गणेशमूर्तींपैकी एक, हे मंडळ दगडूशेठ हलवाई आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांचा एकुलता एक मुलगा प्लेगमध्ये गमावल्यानंतर वैयक्तिक अर्पण म्हणून सुरू केले. कालांतराने, त्यांच्या भक्तीचे कृत्य शहरव्यापी उत्सवात रूपांतरित झाले. जरी ते अधिकृत मानाचे गणपती यादीचा भाग नसले तरी, श्रीमंत दगडूशेठला खूप आदर आहे आणि सजावट, गर्दी आणि विधींचे प्रमाण यामुळे ते एखाद्या शाही दरबारापेक्षा कमी वाटत नाही.

बाबू गेणू नवसाचा गणपती – या उत्साही पंडालमध्ये मंदिर शैलीतील सजावट आणि स्वातंत्र्यसैनिकांचा वारसा एकत्र येतो. स्वातंत्र्यसैनिक बाबू गेनू यांच्या नावावरून हे मंडळ अधिकृतपणे हुतात्मा बाबू गेनू गणेश मंडळ म्हणून ओळखले जाते. हे पुण्यातील प्रसिद्ध गणपती मंडळांपैकी एक आहे, विशेषतः मंदिर-शैलीतील सजावट आणि देशभक्तीच्या मुळांसाठी ओळखले जाते. शेतकरी कुटुंबात जन्मलेले बाबू गेनू नंतर मुंबईत गिरणी कामगार बनले आणि त्यांनी ब्रिटिश व्यापार पद्धतींना सक्रियपणे विरोध केला. हे मंडप भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाचा सन्मान करते आणि प्रतिष्ठित भारतीय मंदिरांनी प्रेरित भव्य, तपशीलवार सेटसह त्यांचा वारसा साजरा करते.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती – पुण्याच्या पहिल्या सार्वजनिक गणपतीत क्रांतिकारी भावनेचा गणेश भक्तीशी मेळावा. १८९२ मध्ये स्थापन झालेला हा पुण्यातील पहिला सार्वजनिक गणपती मंडप होता, जो टिळकांच्या उत्सव चळवळीला पूर्ण आकार येण्यापूर्वी सुरू झाला होता. स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीदरम्यान सामूहिक कृतीला प्रेरणा देण्यासाठी ही मूर्ती स्थापित केली. आजही, हा मंडप त्या वारशाचा सन्मान करत आहे. दरवर्षी, गणेशोत्सवाचा वापर क्रांतिकारी विचार आणि समकालीन सामाजिक मुद्द्यांना उजाळा देण्यासाठी केला जातो ज्यामुळे तो केवळ भक्तिपूर्णच नाही तर तो उद्देशपूर्ण देखील बनतो.

नातू बाग गणपती – पारंपारिक मूर्ती आधुनिक देखाव्याला साजेशी आहे. ही मूर्ती प्रत्येक पंडाल हॉपरसाठी एक दृश्यमान मेजवानी आहे. जर तुम्ही पुण्यातील सर्वात अनोख्या गणपतीसाठी मंडपात येत असाल, तर नातू बाग गणपती हा तुमचा वेगळा रत्न आहे. स्वारगेटजवळ शहराच्या मध्यभागी वसलेले, पुण्यातील हे प्रसिद्ध गणपती मंडप आकार किंवा आकारमानावर अवलंबून नाही, तर ते आकर्षक प्रकाश प्रदर्शने आणि तांत्रिक तेजस्वीतेने झळाळते. येथील गणेशमूर्ती तुलनेने लहान आणि पारंपारिक आहे, परंतु ती त्याला वेगळे करते ती म्हणजे त्याच्या सभोवतालचा देखावा, समन्वित प्रकाशयोजना, स्तरित दृश्य प्रभाव आणि आध्यात्मिक आणि चित्रपटीय वातावरण. जर तुम्हाला दृश्य कथाकथनाची आवड असेल आणि पुण्यातील गणेश मंडपाची सजावट त्याच्या सर्वात सर्जनशीलतेचा अनुभव घ्यायचा असेल, तर ही मूर्ती अवश्य पाहावी.

श्रद्धास्थान ते प्रकटस्थान-शेगांव पायी दिंडी सोहळा

बुलढाणा जिल्ह्यातील मासरूळ या गावाला शेकडो वर्षाचा आध्यात्मिक व ऐतिहासिक वारसा लाभला आहे.या गावात यादवकालीन महादेव मंदिर, दक्षिणमुखी हनुमान मंदिर,राम मंदिर,आई अंबा भवानी मातेचे मंदिर त्याचप्रमाणे चक्रधर स्वामींच्या पावन स्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे.गावात भव्य मंदिरे आहेत. गावातील सर्व जाती धर्मातील लोक सर्व सणसमारंभ गुण्यागोविंदाने साजरा करतात.महादेव मंदिर तथा मारुतीच्या मंदिरामध्ये दररोज सायंकाळी मोठ्या गजरात हरिपाठ म्हटल्या जातो.सुमधुर अश्या या टाळ मृदूंगाच्या आवाजाने गावातील वातावरणाचे प्रसन्न राहते.दरवर्षी गावामध्ये अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला जातो.गावातील तरुण मंडळीसह अबाल वृद्ध तथा महिला भगिनी सर्व धार्मिक कार्यामध्ये हिरीरीने सहभागी होतात.गावातील कालिदास नाना देशमुख व इतर माऊलींचे भाविक मंडळी यांच्या संकल्पनेतून मागील पंधरा वर्षातून संतश्रेष्ठ गजानन महाराज शेगाव येथे भाद्रपद मासारंभाला पायी वारीचे आयोजन करण्यात येते आहे.व यंदा सुद्धा करण्यात आले.या वारीमध्ये सुरुवातीला काही बोटावर मोजण्याचे भाविक सहभागी होते मात्र,या वर्षी अर्थात सन २०२५ मध्ये याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले असून शेकडो युवक तथा जेष्ठ नागरिक सहभागी झाले आहेत.

संत गजानन महाराजांच्या भक्तांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाणारे मासरूळ या गावातून पायी वारी दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी प्रस्थान झाली. संपूर्ण गावातून गजानन बाबांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण गावातील महिला-भगिनींनी सडा-सार वण करून रांगोळ्या काढल्या.सर्व भाविक भक्तांनीगण गण गणात बोते जप करत टाळ मृदुंगांच्या गजरात छान फुगड्या खेळत पालखीचे प्रस्थान केले. प्रकट स्थानासाठी सज्ज झालेल्या दिंडी प्रस्थानसमयी गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.या वर्षीही या पायी दिंडी सोहळ्यानिमित्त गावातील तरुण मंडळी निशुल्क सेवा माऊली चरणी अर्पण केली. त्यामध्ये वाहन खर्च जनार्दन निकम,सुभाष शिंदे,योगेश साळवे,सदाशिव नेवरे,योगेश कापरे,गणेश आल्हाट,भारत पवार यांनी योगदान दिले.आरोग्यविषयी सुविधा नंदकिशोर साळोख व नितीन सावळे यांनी पुरवल्या.त्याचप्रमाणे माऊली रथ सजावट करण्यासाठी लागणारा खर्च निशुल्क स्वरूपात गावातील मंडळी यांनी केला.मृदूंग सेवा गणेशफुसे, किरण देशमुख,राजेंद्र सिनकर यांनी दिली.या पायी दिंडी सोहळ्या दरम्यान गीत गायन संजय सिनकर,भिका अपार,पुंडलिक कोथळकर यांनी केले.अखंड विणेकरी म्हणून नामदेव सिनकर,पुंडलिक सावळे,लक्ष्मण आमले,विठ्ठल बोडखे यांनी सेवा दिली.व त्याचबरोबर गावातील शिवभजनी मंडळ, गणेश भजनी मंडळ, श्री चक्रधर भजनी मंडळ, वाल्मिकी ऋषी भजनी मंडळ व सर्व महिला भजनी मंडळाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

पायी दिंडी सोहळ्याचे मार्गक्रमण श्रद्धास्थान मासरूळ ते प्रकटस्थान शेगाव दरम्यान जामठी, दहिद, देऊळघाट,बुलढाणा वरवंड,बोथा खामगाव असे ठरलेले असते. गावातील श्रद्धाळू भाविक दिंडी दरम्यान सकाळचा नास्ता, माधन्ह भोजन, सायंकाळचे भोजनची व्यवस्था करतात. माऊलीच्या नामघोषातदिंडीचेप्रस्थान होते. यावर्षी तीन दिवसाच्या मुक्कामातील सकाळचा नास्ता व चहा व्यवस्था कडुबा घुले,सुनील देशमुख,विशाल सिनकर, विजय पायघन, गजानन पवार, राजू शेळके यांनी केली. वारकरी मंडळी साठी माध्यन्हभोजनाची व्यवस्था गजानन ताठे, जालिंदर बुधवत,संदीप पाटील, किशोर जाधव,मनोज दांडगे यांनी केली. संध्याभोजनाची व्यवस्था बाळासाहेब देशमुख,संतोष धंदर व श्री गजानन महाराज सेवा समिती वरणा फाटा यांनी केली.त्याचबरोबर वारकरी मंडळीचा रात्रीचा पहिला मुक्का म गुलमोहर हॉटेल जवळ शिवसाई कॉलेज येथे दुसऱ्या दिवशीचा मुक्काम आश्रम शाळा वरवंड येथे तर तिसरा मुक्काम वरणा फाटा येथे निश्चित करण्यात आला आहे.मुक्काम स्थानी सर्व वारकरी मंडळी माऊलीचे भजन,हरिपाठ व पोथीचे वाचन करतात.माऊलीच्या भजन,कीर्तनात व नामस्मरणात तेथील वातावरणात दुमदुमते.मुक्काम स्थानी सर्व सुविधा करण्यात येतात.दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान संध्या उरकून चहा नास्त्याचा आस्वाद घेऊन परत माऊलीच्या नामस्मरणात पालखीचे प्रस्थान करतात.पावसाच्या निसर्गरम्य वातावरणात विशेषत:बोथ्याच्या घाटातील निसर्गरम्य वातावरणात हिरव्यागार वनराईतून पांढऱ्याशुभ्र गणवेशातील माऊलींची पायी दिंडी अगदी शोभून दिसते. रस्त्याच्या दुतर्फा झाडे वृक्ष वेली, खळखळणारी झरे, पशुपक्ष्यांचा किलबिलाट यांचा जणू वारकरी मंडळी सुखद अनुभव घेतात.अध्यात्मबरोबर निसर्ग सानिध्याचा एक आगळा वेगळा अनुभूती दिंडी दरम्यान वारकऱ्यांना येते. बोथा घाटीतील वन्य प्राणी व पक्षी जणू दिंडीचे स्वागत करत उभे राहतात असा भास होतो.असा हा आनंदाचा सोहळा अन सुखद अनुभव घेत सर्व वारकरी माऊलीच्या नामसंकीरत्नात गुंग होऊन व माध्यन्ह काळी तपस्वी महाराज मंदिर येथे भोजनाची व्यवस्था करण्यात येते.त्यानंतर वरणाफाटा येथे श्री महाराज सेवा समितच्या वतीने संध्या भोजन व विश्रांतीची व्यवस्था करण्यात येते.दुसऱ्या दिवशी अर्थात दिंडीच्या चौथ्या दिवशी खामगाव नाका लासुरा मार्गे दिंडी थेट समस्त वारकरी मंडळीसह अखिल कोटी ब्रह्मांड नायक सद्गुरु श्री गजानन महाराजयांच्या प्रवेश द्वाराजवळ येऊन पोहचते. माऊलीच्या भव्य प्रवेश दारातून अगदी शिस्तीत पायी दिंडी सोहळ्यातील वारकरी माऊली च्या मंदिराभोवती प्रदक्षिणा मारतात.माऊलीचे मनोभावे दर्शन घेतात. माऊलीसमोर नत होऊन आपली सुख दुःख सांगतात.शेतकरी,कष्टकऱ्यासह समस्त जगाच्या कल्याणाची प्रार्थना करतात.जड अंतःकरणाने माऊलीचा निरोप घेतात व नव्या उमेदीने वारकरी आपल्या शेतात राबतो. व्यवसायिक आपल्या व्यवसायातून जनतेची सेवा करतो.काही शासकीय निमशासकीय कर्मचारी सुद्धा पायी दिंडीत सहभागी झालेले असतात ते आपल्या सेवेत माऊलीच्या आशीर्वाद घेऊन रुजू होतात.या चार दिवसाच्या पायी दिंडीत वारकरी मंडळी एकमेकांनाच्या सुख दुःखात सहभागी होऊन आध्यात्मिक कुटुंबाचे जणू सदस्य बनतात.मन जुळतात.अन घरी पोहचल्यावर ओल्या डोळ्यांनी एकमेकांचा निरोप घेतात.या पायी दिंडी वारीचा सुखद अनुभव,क्षण उराशी बाळगून जीवनातील एक आध्यत्मिक पायी दिंडी सोहळा माऊलीच्या कृपेनें अनुभवास मिळाला याची धन्यता मानून जीवनभर अशीच माऊली चरणी लीन होण्याची प्रार्थना करतात.

पवित्र अशा या पायी दिंडी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी भाविक वारकऱ्यांसाठी सौम्य स्वरूपाची नियमावली ठरवण्यात आलेली असते. त्यामध्ये विशेषता सर्व वारकरी हे पांढऱ्या गणवेशातच राहतील.१५ वर्षाखालील मुले दिंडीत सहभागी होणार नाही.दिंडी दरम्यान कुठल्याही प्रकारचे व्यसन अर्थात तंबाखू,बिडी सिगारेट अथवा मद्यप्राशन करता कामा नये.अन्यथा दिंडीत प्रवेश मिळणार नाही.असे हे सेवा समितीचे ठरवलेले नियम सर्वजण अगदी तंतोतंत पालन करतात. विशेष असे की, श्रद्धास्थानावर उभारलेल्या माऊलीच्या मंदिरामुळे गावामध्ये आध्यात्मिकतेची ओढ निर्माण झाली.त्यामुळे कित्येक तरुणांनी अध्यात्माच्या वाटेवर येऊन धूम्रपान,मद्यपानाचा त्याग केला व सन्मार्गाची वाट धरली.

अशाप्रकारे असा हा पायी दिंडी सोहळ्याचा शंभर किलोमीटरचा प्रवास श्रद्धास्थानापासून ते प्रकटस्थानापर्यंत जवळपास चार दिवसात व तीन दिवसाच्या मुक्कामामध्ये साधारण दररोज वीस ते पंचवीस किलोमीटरचा प्रवास वारकरी अगदी आनंदाने पार करतात.पायी प्रवासादरम्यान कुठल्याही प्रकारचा थकवा,तणाव न जाणवता उत्साह प्रत्येक वारकऱ्याच्या मनात ओत प्रोत भरलेला दिसून येतो. अध्यात्माबरोबर शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातूनही पायी वारी प्रत्येक व्यक्तीस उपयुक्त आहे. असा वारकरी त्यांच्या अनुभवातून सांगतात. या दिंडी दरम्यान आनंदाच्या सोहळ्याची अनुभूती येते.जीवनात एकदा तरी या पायी वारीचा अनुभव घ्यावा.

गण गण गणात बोते..!

श्री.विनोद शेनफड जाधव
मासरूळ जि बुलडाणा
मो.९७६३२८२०७७

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

गणेश चतुर्थी व गणेशोत्सवानिमित्त राज्यपालांकडून शुभेच्छा

अक्षराज : जे.के.पोळ

दि.२७, ठाणे : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी गणेश चतुर्थी तसेच गणेशोत्सवानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. गणेश चतुर्थी तसेच गणेशोत्सव केवळ राष्ट्रीयच नाही तसेच वैश्विक उत्सव झाला आहे. गणेशोत्सव लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रासाठी केलेल्या त्याग व समर्पणाचे स्मरण देतो. गणेशोत्सव साजरा करताना मंडळांनी सामाजिक सौहार्द व एकोपा वाढवण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन करतो व सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

सणासुदीच्या काळात ही विजाभज आश्रमशाळा कर्मचारी वेतनापासून वंचित

आश्रमशाळा वेतनासाठी तरतूद द्या – आ.अडबाले यांचे प्रधान सचिवांना निवेदन

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.२७, चंद्रपूर : राज्यातील आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे माहे जुलै व ऑगस्टचे वेतन अजूनही झालेले नाहीत. सणासुदीचे दिवस असल्यामुळे शासनाने माहे ऑगस्ट चे वेतन गणेश चतुर्थीपूर्वी करण्याचे आदेश काढलेले असतांना अपुऱ्या तरतुदीमुळे संपूर्ण राज्यातील विजाभज आश्रम शाळा कर्मचाऱ्यांचे जुलैचेच वेतन झालेले नाही त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष आहे. माहे जुलै व ऑगस्टच्या वेतनासाठी भरीव तरतूद उपलब्ध करून देण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी इतर मागास बहुजन कल्याण व वित्त विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र लिहून मागणी केली आहे. इतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत आश्रमशाळांचे वेतन हे नेहमीच एक ते २ महिने उशिराने होत असते. २ महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याने कर्मचाऱ्यांची गृह कर्जे, वाहन कर्जे, एलआयसीचे हप्ते व बँकांच्या इतर कर्जांचे हप्ते यावर बँकांना अतिरिक्त व्याजाचा भरणा करावा लागतो. सणासुदीचे दिवस असून ही असेच पगार उशिरा होत राहिले तर बँका कर्मचाऱ्यांच्या एकाच महिन्याचे पगारातून दोन दोन कर्जाचे हप्ते कपात करतात. परिणामी कर्मचाऱ्यांच्या हातात दमडीही शिल्लक राहत नाही. त्यामुळे आश्रमशाळा कर्मचारी सतत आर्थिक विवंचनेत असतो. सणासुदीचे दिवस असल्यामुळे जुलै व ऑगस्ट चे वेतन अनुदान तात्काळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण व वित्त विभाग यांना पत्र देऊन केलेली असून सर्व कर्मचारी वेतनाच्या प्रतीक्षेत आहेत.

अनधिकृत स्पर्धेत खेळणारे खेळाडू, सामनाधिकारी व संघटक यांच्यावर राज्य कबड्डी संघटनेचा कारवाईचा इशारा

अक्षराज : संदिप येवले

दि.२७, मुंबई : पंचवटी स्टेडियम, नाशिक येथे हौशी फेडरेशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने दि.२९ ते ३१ ऑगष्ट २०२५ या कालावधीत होणाऱ्या ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डीस्पर्धेत कोणत्याही संलग्न जिल्हा संघटनेने सहभाग घेऊ नये.असे महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.ने सर्व जिल्हा कबड्डी संघटनाना कळविले आहे.उपरोक्त स्पर्धा आयोजन करणारी संस्था अखिल भारतीय हौशी कबड्डी महासंघ तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेला संलग्न नाही किंवा त्या संघटनेला भारतीय कबड्डी महासंघाने किंवा महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेने स्पर्धा आयोजनाची कोणतीही मान्यता अथवा परवानगी दिलेली नाही. त्यामुळे उपरोक्त कबड्डी स्पर्धा ही अनधिकृत व नियमबाह्य म्हणून घोषित करण्यात येत आहे.

त्यामुळे या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील(विदर्भ वगळून) कोणीही सहभागी होऊ नये.या अनधिकृत स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संलग्न संघटना, खेळाडू, पंच, क्रीडा कार्यकर्ते व आयोजक संस्था यांच्यावर महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन (MSKA) च्या वतीने कायमची बंदी घालण्यात येईल. सर्व संलग्न जिल्हा कबड्डी संघटनेने सदर स्पर्धेच्या अनधिकृत आयोजनाबाबत आपआपल्या जिल्ह्यात सामाजिक माध्यमाद्वारे जागृती करावी. त्याचे होणारे दुष्परिणाम याची सर्व घटकाना समज द्यावी.असे एका पत्रकाद्वारे राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांनी सर्व प्रसार माध्यमाना कळविले आहे.

पोंभुर्णा येथे शांतता समितीची बैठक

अक्षराज : अरुण कुत्तरमारे

दि.२६, पोंभुर्णा (चंद्रपूर) : आगामी काळातील सण उत्सव शांततेत पार पाडावे व शांतता सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी दिनांक २५ ऑगस्ट २०२५ ला पंचायत समितीच्या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात शांतता समितीची सभा पार पडली. यावेळी उपविभागीय अधिकारी लगी मा तिवारी तहसीलदार मोहनीश शेलवटकर, नगराध्यक्ष सुलभा पिपरी, गटविकास अधिकारी नमिता बांगर, पोंभुर्णा, ठाणेदार राजकमल वाघमारे उमरी पोतदार ठाणेदार ठेंगणे, नायब तहसीलदार रामकृष्ण उईके, दिपाली अत्राम यांची प्रमुख उपस्थित होती.

उपविभागीय अधिकारी लघिमा तिवारी यांनी गणेश उत्सव दरम्यान प्रशासन अलर्ट राहणार आहे. लेझर लाईट वर बंदी घातलेली असून डीजेच्या आवाजाची जी मर्यादा आहे. त्यापेक्षा जास्त आवाज वाढवल्यास संबंधित मंडळावर कठोर कारवाई केली जाईल. गणपती विसर्जन मिरवणूक की दरम्यान कोणालाही त्रास होऊ नये. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी. यासाठी सर्व गणेश मंडळाने नियमाचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. गणेश विसर्जन करण्यात येणाऱ्या घाटावर पथक तयार करण्यात येणार असल्याचे ही त्यांनी सांगितले. ठाणेदार राजकमल वाघमारे यांनी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमधील गणेश उत्सव शांततेत साजरा करण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

शांतता कमिटी व पोलीस पाटील, गावातील सरपंच व गणेश मंडळाच्या बैठक घेण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी सर्व विभागाचे प्रमुख व अधिकारी, शांतता समितीचे सदस्य व पत्रकार उपस्थित होते.

मनोज जरांगेंनी एल्गार पुकारला, ओबीसी नेत्यांचीही आक्रमक भूमिका

दि.२७, नागपूर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी वातावरण पुन्हा तापू लागले आहे. २९ ऑगस्टला मुंबईत मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन करणार असल्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजानेही आपले पत्ते उघडायला सुरुवात केली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'सरकारचा ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबतचा ठाम पवित्रा कायम राहिला, तर आम्हाला रस्त्यावर उतरण्याची गरज नाही. पण जर सरकारने एकतर्फी निर्णय घेतला, तर ओबीसी समाज ६० टक्के ताकदीने संविधानिक हक्काच्या रक्षणासाठी उभा राहील.'

तायवाडे यांनी यावेळी सरकारच्या भूमिकेवरही प्रकाश टाकला. त्यांनी आठवण करून दिली की, 'एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपमुख्यमंत्री होते तेव्हा यांनी स्पष्ट केले होते की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. सरसकट कुणब्यांना प्रमाणपत्रेही दिली जाणार नाहीत. हा पवित्रा कालही ठाम होता आणि भविष्यातही ठाम राहील अशी आमची अपेक्षा आहे.'

मात्र, तायवाडे यांनी सरकारवर विश्वास ठेवतानाही सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, 'सरकारने जे लेखी आश्वासन आम्हाला दिले आहे, त्यामध्ये बदल करण्याची मानसिकता दिसली, तर आम्ही गप्प बसणार नाही. त्या दिवशी ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल आणि आपला हक्क अबाधित ठेवण्यासाठी लढा देईल.' मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत तायवाडेंनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी म्हटले की, 'याआधीही त्यांनी अनेकदा आंदोलनाची घोषणा केली आणि शेवटच्या क्षणी मागे हटले. त्यामुळे या वेळेस ते ठाम आहेत का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. आम्ही 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत आहोत.'

तायवाडे पुढे म्हणाले की, सरकारने आम्हाला ज्या बाबी लेखी दिलेला आहे, त्याच्यामध्ये बदल करण्याच्या मानसिकतेमध्ये सरकार आहे काय..? आणि सरकार अशा प्रकारच्या मानसिकतेमध्ये नसेल ते किती मोठ्या आव्हानाला बळी पडत नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरण्याची गरज नाही आहे. पण सरकार जेव्हा आमच्या विरोधामध्ये जाण्याचा विचारत आहे हे ज्या दिवशी लक्षात येईल ठेवा महाराष्ट्रातील ६०% ओबीसी तेवढेच ताकतीने आपल्या संविधानिक अधिकाराच्या रक्षणासाठी उभा राहील आणि आपल्या संविधानिक अधिकाऱ्याचे रक्षण करणे असेही बबनराव तायवाडे म्हणाले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न मागील काही वर्षांपासून सतत पेटलेला आहे. जरांगे पाटील वारंवार आंदोलन करून सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे, ओबीसी समाजाला भीती आहे की, मराठ्यांना आरक्षण देताना त्यांच्या हक्कांवर गदा येऊ शकते. त्यामुळेच ओबीसी नेते सतत सतर्क राहून भूमिका मांडत आहेत.

पाटण तालुक्यात जल्लोषात बाप्पांचे आगमन...

अक्षराज : सुरेश संकपाळ

दि.२७, पाटण : पाटणसह तालुक्यात शनिवार २७, रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी मंगलमय वातावरणात मोठ्या उत्साहात गणपती बाप्पांचे आगमन झाले. गणेश भक्तांनी गणरायाची घरोघरी व सार्वजनिक गणेश मंडळात आनंदी, जल्लोष व उत्साहपूर्ण वातावरणात प्रतिष्ठापना केली. दिवसभर पारंपारिक वाध्याने गणेशभक्त सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्ती मंडळात नेत होते. अगदी लहानग्यांपासून ते अबाल वृद्धांपर्यंत आणि मुंबईकर मंडळी देखील खासकरून गणेशोत्सवाला दाखल झाली असून गणेशाच्या आगमनाने गणेश भकताचा आनंद गगनात . मावेनासा झाला होता तर

येथील कुंभारवाड्यात सकाळी ७ वाजल्यापासून गणपती बाप्पाला आपापल्या घरी नेताना धावपळ सुरु होती. सकाळपासून पावसाने उघडीप दिल्याने गणेश भक्तांच्या चेरयावर आनंद दिसत होता दरम्यान तालुक्याच्या विविध विभागात सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश भक्तांनी गणेश मूर्ती घेउन जातांना दिसत होते. तर 'गणपती बाप्पा मोरया महणत गणरायाला भक्त नेताना जयघोष करत होते. सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांचे कार्यकर्ते घेवून जात होते.पाटण तालुका दुर्गम आसल्याने व डोंगराळ भागातील भाविकांनी मंगळवार, दि, २६, रोजी आदल्या दिवशीच गणेश मूर्ती आप आपल्या गावामध्ये नेल्या होत्या

पाटणकर वाड्यातील मानाच्या गणपतीसह पाटण शहरात घरोघरी गणेशाची प्रतिष्ठापना केली. दुपारी १२ वाजल्यानंतर सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, शासकी कार्यालये यांच्या गणेशाच्या मूर्ती नेण्यासाठी सजविलेले ट्रैक्टर, ट्रॉली यांची कुंभारवाड्यातून नेताना दिसत होते. सर्वत्र आनंद ओसडून वाहत होता. त्यामुळे पाटण परिसरातील वातावरण मंगलमय बनले होते. पाटण तालुक्यात सुमारे एक ते दीड हजारच्या आसपास गणेश उत्सव मंडळामार्फत गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात येते. यामध्ये सार्वजनिक गणेश उत्सव मंडळे असून उर्वरित शासकीय कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय समावेश आहे.ठिक ठिकाणी एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविण्यात आली असून

त्या ठिकाणी गणपतीची आराधना करण्यात येत आहे. गणरायाच्या आगमनाबरोबर उभा पाटण तालुका गणेशमय झाला आहे. पाटणवाशिय कोयनानगर, मोरगिरी, मल्हारपेठ, ढेबेवाडी, चाफळ, मणदुरे, वनणकुसवडे पठार, तारळे, आदी ठिक ठिकाणी गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले आहे. पाटणमधील मानाचा हनुमान सेवा मंडळ,शिवाजी उदय मंडळ, समाजसेवा मंडळ, प्रताप सेवा मंडळ, नूतन तरुण मंडळ, अष्टविनायक तरुण मंडळ,

रणजित सेवा मंडळ, बालगणेश मंडळ, गणेश सेवा मंडळ, भोईराज मंडळ, गजानन मंडळ, शिवलिंग मंडळ, श्रीराम गणेश मंडळ, नवभारत मंडळ, भाजी मंडई मंडळ, गणेश सेवा मंडळ, कलाकार मंडळ, पाटण शहर रिक्षा मंडळ, या मंडळानी गणरायाची प्रतिष्ठापना उत्सहात केली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर फुलांच्या दरात दुपटीने वाढ...

अक्षराज : विकास दळवी

दि.२७, ठाणे :

मागील काही दिवसांपासून राज्यभरात सुरू असलेल्या पावसामुळे शेतातील फुलांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे अनेक ठिकाणी फुलांच्या उत्पादनात घट झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. परिणामी ठाण्यातील फुलबाजारात फुलांची आवक घटल्यामुळे फुलांच्या दरात दुपटीने वाढ झाली आहे. गणेशोत्सवाच्या तोंडावर ही दरवाढ झाली असून शेवंतीचे दर ४०० रुपये किलो तर, गुलाब ६०० रुपये किलोने विकला जात आहे. इतर फुलांचे दरही दुपटीने वाढले आहेत.

फुलांचे दर (किलो)

गोंडा – २०० रुपये
गुलाब – ६०० रुपये
शेवंती – ४०० रुपये
अस्टर – १६० ते २०० रुपये
कमळ – ४० रुपये (एक नग)
लिली – ५० रुपये (एक बंडल)
कनेरी – १००० रुपये

ठाणे जिल्ह्यात यंदा दीड लाखाहून अधिक गणेशमुर्तींची प्राणप्रतिष्ठाना झाली असल्याची स्थिती आहे. त्यामुळे या उत्सवाची लगबग सर्वत्र अनुभवयाला मिळत आहे.मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा होत असल्याने

फुलांची मागणी मोठ्या प्रमाणात असते. दिड, तीन, पाच आणि दहा दिवसांसाठी घरगुती तसेच सार्वजनिक उत्सवाची तयारी सुरू आहे.

गणेश मूर्तीच्या आगमन ते विसर्जनापर्यंत कुणीही कमी पडत नाही. यासाठी गणेशभक्त अनेक दिवसांपासून तयारीला लागले आहेत. सजावट आणि पूजेसाठी गणेशोत्सवाच्या काळात बाजारपेठेत फुलांची स्वाभाविक मागणी असते. मात्र, मागील काही दिवसांपासून राज्यभरात मुसळधार पाऊस पडत असून त्याचा परिणाम फुलांच्या उत्पादनावर झाला आहे. पावसामुळे शेतातील फुलांचे नुकसान झाल्याने फुलांच्या उत्पादनात घट झाली आहे. त्या पावसामुळे अनेक फुले भिजली जातात. त्यामुळे ती बाजारात दाखल होण्यापूर्वीच खराब होऊन जातात. परिणामी फुलांची आवक कमी झाल्याने फुलांच्या दरात दुपटीने वाढ झाली आहे. ठाणे परिसरातील बाजारात फुलांच्या मागणीत वाढ झाली असून घटलेल्या आवकेमुळे फुलांच्या दरवाढीचा फटका थेट ग्राहकांना बसला आहे.

श्रीगणेशोत्सव २०२५ निमित्त विसर्जनकरीता उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावांचा पाहणी दौरा

अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.२७, मिरा-भाईंदर : श्रीगणेशोत्सव २०२५ विसर्जन निमित्त मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, पोलिस उपायुक्त राहुल चव्हाण (भा.पो.से.), शहर अभियंता दिपक खांबित यांनी शहरातील विविध ठिकाणी श्रीगणेश विसर्जनाकरिता उभारण्यात आलेल्या प्रमुख कृत्रिम तलाव स्थळांना भेट देऊन तेथील तयारीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. काशिमीरा जरीमरी तलाव, सातकरी तलाव मिरा रोड, साईदत्त तलाव पेणकरपाडा, शिवार गार्डन तलाव, जेसल पार्क चौपाटी तसेच भाईंदर पश्चिम चौपाटी, राई तलाव, मुर्धा तलाव या ठिकाणी उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या

पाहणीदरम्यान विसर्जन काळात नागरिकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा सविस्तर आढावा घेतला. सुरक्षिततेसाठी केलेल्या तयारी, स्वच्छतेची काटेकोर व्यवस्था, वीजपुरवठा आणि प्रकाशयोजना, वैद्यकीय सुविधा, पोलीस व सुरक्षेची यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या प्रसंगी उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त कविता बोरकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस निरीक्षक, महापालिकेचे कनिष्ठ अभियंता यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. ३३ कृत्रिम तलावांसोबत मुर्ती स्विकृती केंद्र उभारण्यात आले आहेत. तसेच ६ फूटाखालील श्रीगणेश मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जन करणे बंधनकारक आहे. पूजासाहित्य व निर्माल्य पाण्यात न टाकता स्वतंत्ररित्या

जमा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. समुद्र, खाडी व तलावांमध्ये प्लास्टिक टाकू नये. तसेच विसर्जनाच्या वेळी प्रशासन व पोलीस यांचे मार्गदर्शन घेऊन शिस्त पाळावी. श्री. गणेशोत्सव हा सामाजिक ऐक्याचा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. त्यामुळे स्वच्छता, सुरक्षितता आणि पर्यावरण संरक्षण यांना प्राधान्य देत नागरिकांनी हा उत्सव पर्यावरणपूरक साजरा करावा, असे मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा नगरपरिषद व तहसील कार्यालयावर मोर्चा

अक्षराज : साहेबराव गागलवाड

दि.२६, मुदखेड(नांदेड) : शहरातील महात्मा गांधी विद्यालय ते मुख्य रस्ता डॉ पचलिंग यांच्या हॉस्पिटलपर्यंत तातडीने करावा या प्रमुख मागणीसाठी मुदखेड च्या महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा नगरपरिषद व तहसील कार्यालयांवर शिक्षक शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी मोर्चा धडकला नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी दळवी व तहसील कार्यालयात नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांच्याकडे महात्मा गांधी विद्यालयाच्या वतीने सिमेंट काँक्रेट रस्ता करण्याबाबत लेखी निवेदन सादर करण्यात आले. तूर्तास शहरातील महात्मा गांधी विद्यालयाकडे जाणारा रस्ता हा अत्यंत खराब झाला असून रस्त्यावर नगरपालिकेची जागा आपली जहागीर समजून काही मंडळींनी अतिक्रमण केले आहे. जिल्हा परिषद शाळा ही अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली आहे.

त्यामुळे महात्मा गांधी विद्यालयाकडे दररोज या रस्त्यांवरून येण्या जाण्यासाठी पावसाळ्याच्या दिवसांत मोठी कसरत करावी लागत आहे तालुका मुख्यालय असलेले महात्मा गांधी विद्यालय हे नामांकित विद्यालय असून या विद्यालयात शहरी व ग्रामीण भागातील जवळपास दोन हजार मुले मुली शिक्षण घेतात शाळेकडे जाणारा रस्ता जागोजागी उकडून गेल्यामुळे अपघात होत असून यांमुळे विद्यार्थी पालक व शिक्षक वृंद यांना रस्त्याअभावी कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.

या मागणी करिता नगरपरिषदेकडे मे महिन्यांत निवेदन सादर करण्यात आले होते परंतु अद्यापही या मागणीची पूर्तता नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात आली नसल्यामुळे तालुकास्तरीय प्रशासनाचे रस्त्याच्या मागणी करिता लक्ष वेधण्यासाठी चक्क महात्मा गांधी विद्यालयाने सिमेंट काँक्रीट रस्ता झालाच पाहिजे या घोषणांनी शहर नगरपरिषद आणि तहसील कार्यालयाचा परिसर दणाणून सोडला.

माहिती घेऊन कार्यवाही करू.

मुख्याधिकारी दळवी नगरपरिषदेचा आपण नुकताच पदभार घेतला असून यापूर्वी सदर रस्त्याच्या मागणी विषयी काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती घेऊ व निधीची उपलब्धता झाल्यानंतर महात्मा गांधी विद्यालयाकडे जाणारा रस्ता पूर्ण करू अशी प्रतिक्रिया मोर्चेकरांच्या शिष्टमंडळाशी बोलताना नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी दळवी यांनी दिली. तहसील कार्यालयात नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांना महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबुराव नाईक व विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले याप्रकरणी उचित कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाला कळविण्यात येईल असे आश्वासन नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांनी मोर्चेकरांच्या शेष्ठ मंडळाला दिले. या मोर्चात महात्मा गांधी विद्यालयातील बहुतांश शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महावाड्मय प्रकाशित

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा एकत्रित साहित्यातून नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होईल - मुख्यमंत्री

अक्षराज : जे.के.पोळ

दि.२७, ठाणे : क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा त्यांच्या एकत्रित साहित्याच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत जाईल. या साहित्यामुळे नवीन पिढीला प्रेरणादायी दिशा मिळून यशस्वी होण्याचा मार्ग मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाड्मयाचे प्रकाशन करण्यात आले. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाज्योती संस्थेमार्फत ह्या महावाड्मयाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नव्या संकेतस्थळाचे उद्घाटनही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मंत्रिमंडळातील अन्य मंत्रीगण तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यामध्ये महात्मा फुले यांचे २३ आणि सावित्रीबाई फुले यांचे १४ ग्रंथ, त्यांचा पत्रव्यवहार तसेच महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचा समावेश आहे. पुण्यातील महात्मा फुले वाडा आणि साताऱ्यातील नायगाव येथील सावित्रीबाईंच्या शिल्पसृष्टीची रंगीत छायाचित्रे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मान्यतेने हा ग्रंथ प्रकाशित झाला असून, एकूण २७ हजार प्रती छापण्यात आल्या आहेत.

प्रत्येक जिल्ह्यात ७५० प्रतींचे वितरण जिल्हास्तरीय शिक्षण विभाग, आर्थिक विकास मंडळ तसेच आश्रमशाळा व वसतिगृहांमार्फत करण्यात येणार आहे. विभागाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून विभागाच्या सर्व योजना, शिष्यवृत्ती, वसतिगृहे तसेच विविध शासकीय उपक्रमांची माहिती नागरिकांना एका ठिकाणी सहज उपलब्ध होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले हे संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सोयीस्कर, सुलभ असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

३१ ऑगस्ट मुक्ती दिनानिमित्त सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक, मार्गदर्शन व आरोग्य शिबीर आयोजन

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.२७, चंद्रपूर : अखिल भारतीय विमुक्त जाती, भटक्या जमाती वेलफेअर संघ दिल्ली, महाराष्ट्र, जिल्हा चंद्रपूर तथा इतर मागासवर्ग, बहुजन कल्याण, सामाजिक न्याय विभाग चंद्रपूर तर्फे आयोजित ३१ ऑगस्ट ला मुक्ती दिवस शासन स्तरावर विविध सामाजिक संघटनांच्या सहयोगाने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध योजनांचे माहितीपर मार्गदर्शन व आरोग्य शिबीर आयोजन करून विमुक्त जाती, भटक्या जमाती चां इतिहास, राष्ट्र उभारणीसाठी असलेले भरीव योगदान प्रति स्मृतींना उजाळा देऊन सदर समाजाचे देशासाठी चे महत्त्वाचे योगदान व संस्कृती नवीन पिढीला अवगत करून देणे. व सदर समाज सर्वांगीण दृष्ट्या राज्य व राष्ट्रीय विकासाचे प्रवाहात आणण्यासाठी जनजागृती करण्याचे उदात्त हेतूने महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा मुक्ती दिवस शासनस्तरावर साजरा करण्याचे आदेश काढले.

त्यानुसार अखिल भारतीय विमुक्त जाती, भटक्या जमाती वेलफेअर संघ दिल्ली चे महाराष्ट्र प्रदेश शाखा व जिल्हा शाखा चंद्रपूर तसेच समाज कल्याण विभाग, इतर मागासवर्ग, बहुजन कल्याण विभाग चंद्रपूर चे संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जलनगर वार्ड, चंद्रपूर येथे रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ ला सकाळी ११.०० वाजता सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक मार्गदर्शन व आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आ. किशोर जोरगेवार तर कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंदराव वाय. अंगलवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अखिल भारतीय विमुक्त जाती, भटक्या जमाती वेलफेअर संघ दिल्ली. विशेष मार्गदर्शक डॉ. नरसिंम्हाराव गुंजी, समन्वयक दक्षिण भारत डी.एन. टी समाज हैद्राबाद, विनोद मोहतुरे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग चंद्रपूर, सचिन मडावी सहाय्यक संचालक इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग चंद्रपूर, रोहन कांबळे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग चंद्रपूर तसेच चंद्रपूर जिल्हा, विदर्भ महाराष्ट्र स्तरातील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील विवध संघटनाचे अध्यक्ष व अनुभवी प्रमुख मार्गदर्शक मान्यवर सर्वश्री कृष्णाजी नागपुरे, प्रभाताई चिलके, चंद्रशेखर कोटेवार, डॉ.योगेश दुधपाचारे, डॉ. राजू ताटेवार, दिवाकर बावणे, संतोष लहामगे, अनिल बोरगमवार, दिवाकर पुद्दटवार, डॉ.सुधाकर कामतकर, संतोष गर्गेलवार, प्रा. विश्वनाथ राठोड, विठल कुसळे, बाळू पवार, उद्दव पुरी, डॉ. मंगेश गुलवाडे, डॉ.मनोज कुपरणे, किसन कलीवाले, रमेश गदईकर, सोमेश्वर पडगेलवार, महाराष्ट्र संघटन प्रमुख, अशोक पडगेलवार, अँड.मनोज पारशिवे, चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष, अशोक जाधव, रतन शिलावार, रंजनाताई पारशिवे, किरण नागपुरे, नीता नवरखेले चंद्रपूर जिल्हा महिला अध्यक्ष इत्यादींचे प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. तेंव्हा बहुसंख्येने समाज बंधू भगिनी व युवकांनी सदर कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन व आरोग्य शिबिराचे लाभ घ्यावे, असे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग चंद्रपूर चे अधिकारी व सचिन चलकलवार जिल्हा सचिव एका पत्रकान्वये आवाहन केले आहे.

थोडक्यात

विंचूर येथे 'अमृतवक्ता' श्री घळसासी यांच्या ७ दिवशीय श्रीराम कथेला सुरुवात

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.२७, विंचूर (नाशिक) : विंचूर येथील दुसाने परिवारातर्फे आईच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त श्रीरामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे अमृत वक्ता व विद्वान ह.भ.प. विवेक घळसासी (नागपूर) यांच्या रसाळ वाणीतील रामकथा कार्यक्रमास सुरुवात झाली असून, यात भाविकांना अध्यात्मिक ज्ञान व संस्कारांबरोबर इतके वर्ष होऊन गेलेल्या देवांचे श्रीराम कथा, कृष्ण कथा, शिव कथा का श्रवण करायची या विषयावर घळसासी यांनी मौलिक विचार श्रोत्यांसमोर मांडले. हा राम कथा सोहळा मंगळवार, दि.२६ ऑगस्ट ते रविवार, दि.३१ ऑगस्ट २०२५ रोजी दररोज रात्री ८ ते १० वा. आयोजित केला आहेत. तसेच सोमवार, दि.०१ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९:३० ते १२:३० वाजता विशेष कार्यक्रम होईल. या दिवशी दुपारी १२:३० ते ३ वाजता महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे ठिकाण निसर्ग मंगल कार्यालयात केले आहे. ह.भ.प. विवेकजी घळसासी यांचा जन्म भूमिकुंड पंढरपूर येथे झाला असून, गेल्या ४३ वर्षांपासून व्यासपीठावरून अखंड सेवा देत आहेत. त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, मॉरिशस, दुबई आदी परदेशातही मराठी–हिंदी भाषेत व्याख्याने दिली आहेत. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

खावडा प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला द्यावा - वनमंत्री नाईक

अक्षराज : जे.के.पोळ

दि.२७, ठाणे : पालघर जिल्ह्यातील खावडा अतिउच्च दाब विद्युत वाहिन्यांच्या उभारणीसाठी सुरू असलेल्या कामामध्ये प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना तुलनात्मकरित्या जास्त असलेला मोबदला देण्यात यावा. स्थानिक प्रशासन आणि संबधित कंपन्यांनी समन्वयाने प्रश्न मार्गी लावावा असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले. पालघर जिल्ह्यातील खावडा अतिउच्च दाब विद्युत वाहिन्यांच्या उभारणीतील दर निश्चिती व इतर विषयांच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी खासदार डॉ. हेमंत सावरा, पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ.इंदूमणी जाखड, व्ही.सी.द्वारे जिल्हा पोलीस अधिक्षक पालघर यतिश देशमुख, रेझोनियाचे कार्यकारी संचालक निनाद पितळे, 'महापारेषण' चे कार्यकारी अभियंता उल्हास ताकपिरे, महाप्रबंधक के.बी. सुब्रहम्यन्यम, अदानी पावर, रेझोनिया, पावरग्रीड कॉरपोरेशन ऑफ इंडिया लि. यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, पालघर जिल्ह्यातील खावडा अतिउच्च दाब विद्युत वाहिन्या उभारणीचे काम अदानी पावर, रेझोनिया, पावरग्रीड कॉरपोरेशन ऑफ इंडिया लि, महापारेषण या कंपन्यांतर्फे सुरू आहे. जिल्हा प्रशासनाने व या कंपन्यांनी शेतकऱ्यांना व स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन काम करावे. या प्रकल्पासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. शेतकऱ्यांना देय मोबदला मूल्यांकन तुलनात्मकरित्या जास्तीत जास्त देण्यासाठी प्रशासन व खासगी कंपन्यांनी प्राधान्य द्यावे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून हा प्रश्न सोडवावा. या प्रकल्पाची कामे गतीने करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नोडल अधिकारी नेमले असून पालघर जिल्हाधिकारी देखील हे काम गतीने करत आहेत. कामाची अशाच प्रकारे गती ठेवल्यास हे प्रकल्प विहित वेळेत पूर्ण होतील असेही नाईक म्हणाले.

सातारा जिल्हा परिषदेचा गौरव

अक्षराज : विकास दळवी

दि.२७, सातारा : पंचायत विकास निर्देशांकमध्ये राज्यातील प्रथम दहा जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व राज्यस्तरावरील टीमचा सत्कार करण्यात आला. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ९ व्या स्थानावर सातारा जिल्हा परिषद असल्याने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल देसाई यांचा तसेच सर्व पंचायत समित्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चौथ्या स्थानावर असलेल्या पंचायत समिती खंडाळाचे गट विकास अधिकारी अनिल वाघमारे यांचा आणि ग्रामपंचायत विभागामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुसऱ्या स्थानावर असणाऱ्या मान्याचीवाडी, ता.पाटणचे सरपंच रवींद्र माने यांचा ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शामला पंडित (दीक्षित) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्काराने सन्मानित

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२७, पुणे : कवयित्री, लेखिका, अध्यापिका, शामलाक्षरी काव्य निर्मितीच्या उद्गात्या व प्रकाशिका शामला पंडित (दीक्षित) यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका व कलारंजन सांस्कृतिक संस्था आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, रोख रक्कम, ग्रंथ व शाल देऊन गौरविण्यात आले. काव्य प्रकारात नवनवीन प्रयोग करणाऱ्या आणि ज्यांच्या नावावर १६ काव्यसंग्रह आणि एक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अशा कवयित्री शामला पंडित (दीक्षित) यांना साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्कार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था
व कलारंग सांस्कृतिक संस्था यांच्या संयुक्तरित्या उपक्रमातू
साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ.
अण्णा भाऊ सा
यांच्या 105 व्या ती निमित्त
सांस्कृ क्रम

प्राप्त झाला.त्यांनी प्रणाली प्रकाशनच्या माध्यमातून चाळीसपेक्षा अधिक साहित्यिकांची पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.त्यांनी शामलाक्षरी (समान शब्द, अर्थ भिन्न) असलेल्या नवकाव्य प्रकाराची देणगी मराठी साहित्याला दिली आहे. शामलाक्षरी हा काव्य प्रकार साहित्यिकात रूढ झाला असून शामलाक्षरी काव्य प्रकारात पाच प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहे.

अध्यापिका म्हणून शालेय स्तरावर नाट्यसंहिता लेखन, दिग्दर्शन त्यांनी केल आहे. सकाळ नाट्यवाचन स्पर्धेत अनेक वेळा यश संपादन केले आहे. पिंपरी चिंचवडचा आदर्श शिक्षक पुरस्कार, मुंबई व धुळे येथील साहित्यरत्न पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.

खासदार श्रीरंग बारणे, विधानपरिषद आमदार उमाताई खापरे,कलारंग सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करून साहित्यिकांना गौरविले.

त्याप्रसंगी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब रसाळ, अनिल सौंदळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेवक शितल शिंदे, भाजपा महिला उपाध्यक्ष सुप्रिया चांदगुडे, नगरसेवक राजेंद्र बाबर, संदीप वाघेरे, अमित गावडे, कैलास कुटे, सुजाता पालांडे, जयश्री गावडे, वैशाली काळभोर, राजू दुर्गे, सामाजिक कार्यकर्ते मनोज सूर्यवंशी, ह.भ.प अशोक महाराज गोरे, साहित्य संवर्धन समितीचे अध्यक्ष सुरेश कंक आदी मान्यवर उपस्थित होते. निमंत्रक म्हणून आमदार अमित गोरखे यांनी साहित्यिकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की,अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल. द फोक परंपरा या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमातून सादर केलेल्या शाहिरी, पोवाडे, लोकगीते व लोकसंगीत या संगीतमय कार्यक्रमाचा आनंद उपस्थित रसिकांनी घेतला.